

# 'तथापि'चा जिव्हाळा

## अंतरंग


**संपादकीय** ... १

**मागोवा** ... २
आरक्षण आणि सामाजिक न्याय

**आरोग्य वार्ता** ... ४
'आकडी'ची साथ
आरोग्याची वाताहात...

**अभियान वार्ता** ... ५
स्त्री चळवळ: चिकित्सक आढावा व आव्हाने

**अनुभव** ... ६
बघ्यांच्या समाजात स्त्रियांची विटंबना

**भूमिका** ... ७
न जन्मलेल्या 'नकोश्या'

**शरीर साक्षरता** ... ८
मूल न होणे: भाग २

**हमसफर** ...१०
पुरुषांसाठी प्रशिक्षण मार्गदर्शिका

**माहितीच्या जगात** ...११
तथापिची नवीन प्रकाशने


प्रिय साथी,

एका साधारण कुटुंबाची गंगाजळी एका फटक्यात कशाने रिकामी होते? विदर्भात गेल्या पाच वर्षात झालेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमधून काही कारणं ठळकपणे दिसून आली. शेती आणि बियाणांवरचा खर्च, कुटुंबातली आजारपणं आणि मुलीचं लग्न ही काही मुख्य कारणं. सरकारी आरोग्यसेवा नसल्याने लोक खाजगी वैद्यकीय सेवांवर अवलंबून आहेत आणि आजारपणांवर होणारा खाजगी आरोग्य क्षेत्रातला खर्च कर्जाचं एक मुख्य कारण आहे.

जिव्हाळ्याच्या या अंकात विविध लेखांमधून खाजगी क्षेत्राबाबत प्रश्न उठवले आहेत. पहिला प्रश्न वैद्यकीय महाविद्यालयातील आरक्षणाचा आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावर काही विद्यार्थी आणि खाजगी डॉक्टरांनी केलेल्या विरोधाचा खाजगी वैद्यकीय व्यवसाय आणि नफ्याची समीकरणं या संदर्भात मागोवा घेतला आहे .

खाजगी वैद्यकीय क्षेत्राच्या अनिर्बंध कारभाराच्या पार्श्वभूमीवर पुण्यात नुकतीच जन आरोग्य अभियानाने एक रुग्ण हक्क परिषद आयोजित केली होती.. महाराष्ट्रात खाजगी रुग्णालयांसाठी बॉम्बे नर्सिंग होम रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ या कायद्यात डिसेंबर २००५ मध्ये काही सुधारणा करण्यात आल्या. या नियमावलीत रुग्णांच्या किमान हक्कांचा समावेश असावा असं ठामपणे मांडण्यात आलं. तपासण्या व उपचारासाठी येणाऱ्या खर्चाची माहिती दवाखान्यात लावणे, गोपनीयता, दुसऱ्या तज्ज्ञाचं मत घेण्याचा हक्क, तक्रार करण्याचा हक्क इत्यादीचा यात समावेश असावा अशी मागणी करण्यात आली.

महाराष्ट्रातील ११ जिल्ह्यात दोनशेहून अधिक गावांमध्ये पसरलेल्या चिकन गुन्याच्या साथीदरम्यान खाजगी डॉक्टरांच्या भूमिकेचा विचार व्हायला हवा. या आजाराने लोकांच्या अंगातलं त्राण गेलं पण अनेक भागात खाजगी डॉक्टरांचे मात्र खिसे गरम केले. सरकारी आरोग्य यंत्रणेच्या उशीरा सुरु झालेल्या आणि साथ आटोक्यात आणण्यासाठी अपुऱ्या ठरलेल्या उपायांचा फायदा डॉक्टरांनी नक्कीच उठवला आहे.

११ व्या पंचवार्षिक योजनेच्या दिल्ली येथे भरलेल्या नियोजन बैठकीतील चर्चेतून असं दिसून येतं की मेडिकल टूरिझम आणि खाजगी आरोग्य क्षेत्राला जास्त प्राधान्य देण्यात येत आहे.

या घडामोडींचा वेध घेणाऱ्या लेखांबद्दल तुमचं मत आम्हाला जरुर कळवा. तसंच याला कसा विरोध करता येईल याबद्दलचे अनुभव आणि कल्पनाही आम्हाला लिहून पाठवा. चांगल्या कल्पना आणि अनुभव हे कायमच प्रेरणा देणारे आणि बळ वाढवणारे असतात.

महाराष्ट्रातील स्त्री मुक्ती आंदोलन संपर्क समितीने २५ वर्षं पूर्ण केल्याच्या निमित्ताने महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा आढावा घेणारी एक बैठक पुण्यात पार पडली. स्त्री चळवळ, तिची बदलती रुपं आणि भविष्यातील आव्हाने या विषयी या बैठकीत झालेली खुली चर्चा, वाद विवाद आणि भविष्याविषयीची मतं सगळ्यांसाठीच उत्साह वाढवणारी पुढील वाटचालीसाठी प्रेरणादायी ठरली. सध्या इतकेच.

आपली, तथापि टीम

मा गो वा

# आरक्षण व सामाजिक न्याय

डॉ. किशोर खिलारे, चिंचवड, पुणे

मानव संसाधन विकास मंत्री अर्जुन सिंग यांनी उच्च शिक्षण संस्थांमध्ये इतर मागासवर्गीयांसाठी आरक्षण लागू करण्याची घोषणा केली आणि उच्च शिक्षण घेणारे मूठभर विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी या निर्णयाविरोधात आंदोलन छेडले. आंदोलनकर्त्यांनी उठवलेले गुणवत्तेचे आणि जातीभेदाचे मुद्दे या पार्श्वभूमीवर आरक्षणाची गरज आणि सामाजिक न्यायाचा विचार आवश्यक आहे. जातीभेद आहेत तोपर्यंत जातीवर आधारित आरक्षणही गरजेचंच आहे हे लक्षात घेऊन सामाजिक न्यायाचा विचार या लेखात मांडण्यात आला आहे.

सध्या आरक्षणाच्या प्रश्नावर प्रचंड वादळ उठले आहे. समाजातील पुढारलेले, आर्थिक व राजकीय सत्ताधारी घटक स्वत:चे वर्चस्व टिकवण्यासाठी दुर्बल घटकांच्या सबलीकरणाच्या प्रयत्नांना नेहमीच विरोध करतात. देशाची प्रगती म्हणजे समाजातील सर्व घटकांची प्रगती याकडे ते स्वत:च्या समाज घटकाच्या, वर्ग-जाती वर्चस्वाच्या स्वार्थी हेतूने दुर्लक्ष करतात. स्वातंत्र्य मिळून जवळ जवळ ५९ वर्षांनंतरही जागतिक पातळीवर मानवी विकास निर्देशांकामध्ये आपल्या देशाचा क्रमांक शंभराच्या पुढे आहे याचा आपण सर्वांनी मिळून विचार केला पाहिजे.

**वंचितांच्या उन्नतीसाठी आरक्षण**

पंचायत राज पद्धतीत स्त्रियांसाठी आरक्षण ठेवल्यामुळे ग्राम पंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिकांमध्ये निर्णयप्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग वाढत आहे. तथापि विधानसभा व लोकसभेमध्ये अजूनही स्त्रियांसाठी आरक्षण नाही. त्यासाठी स्त्री संघटना लढा देत आहेत. आपल्या समाज व्यवस्थेत स्त्रियांचे दुय्यम स्थान आहे. त्यांना हजारो वर्षे शिक्षणापासून वंचित ठेवले होते. स्त्रियांनाही शूद्रांसारखीच वागणूक मिळत होती. राजा राम मोहन रॉय, महात्मा जोतिबा फुलेंसारख्या अनेक समाज सुधारकांनी त्याविरुद्ध आवाज उठवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेत स्त्रियांना समान अधिकार दिले. परंतु आपल्या समाजात स्त्रियांना अजूनही बरोबरीची वागणूक दिली जात नाही. लोकसंख्येत स्त्रियांचे प्रमाण ५० % असूनही त्यांना सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक समानता नाही. स्त्रिया या कमकुवत घटकामध्ये येतात. या घटकाच्या उन्नतीसाठी नोकऱ्यांमध्ये व राजकीय सत्तेत आरक्षण ठेवणे हा अनेक उपायांपैकी एक उपाय आहे.

स्त्रियांप्रमाणेच आपल्या समाजात शूद्रातिशूद्रांना हजारो वर्षे शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले आहे. त्यांना न्याय हक्क, समानता व माणसासारखे जगणे नाकारले गेले. या दुर्बल घटकाच्या सबलीकरणासाठी सर्वप्रथम छत्रपती शाहूमहाराजांनी आपल्या संस्थानात आरक्षणाची सुरुवात या शतकाच्या प्रारंभी केली.

आजही अनुसूचित जाती, जमाती भटक्या विमुक्त जाती व इतर मागासवर्ग यामध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. राज्यघटनेने जरी समानता दिली असली तरी प्रत्यक्ष समाजरचनेत समान वागणूक दिली जात नाही. एकूण लोकसंख्येत या घटकांचे प्रमाण ५०% हून अधिक असूनही त्यांना केवळ ४८% आरक्षण ठेवण्यात आले आहे. त्यापैकी इतर मागास जाती मोठ्या प्रमाणात आहेत. त्यांच्याकरिता २७% आरक्षण जाहीर असताना मूठभर आरक्षण विरोधकांनी इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांसोबत मोठ्या विरोधाचे चित्र निर्माण केले. एक वाहिनीने 'आरक्षण हवे की नाही' यावर मतदान घेतले असता 'आरक्षण हवे' हा बहुमताचा कौल मिळाला.

> केंद्र सरकारच्या अखत्यारीतील उच्च दर्जाच्या व्यावसायिक शिक्षण संस्थांमध्ये २७% राखीव जागा ठेवल्या, म्हणजे खुल्या वर्गातील किती जागा कमी होतात हे तपासले पाहिजे. भारतातील सर्व आय आय टी मध्ये मिळून फक्त ४००० विद्यार्थ्यांची सोय आहे. सर्व आय आय एम मिळून फक्त १५०० जागा आहेत. नॅशनल लॉ स्कूलमध्ये ४८० आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइनमध्ये २८० जागा. इतर काही संस्थांमध्येही अशाच कमी जागा आहेत. यातील २७% जागा राखीव झाल्या म्हणजे जेमतेम ५००० जागासुद्धा कमी होत नाहीत. *गोविंद पानसरे (लोकसत्ता, १३ जुलै २००६)*

**ज्ञानाची मालकी ठराविक जातींची नाही**

आरक्षणाच्या विरोधात वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयातील काही विद्यार्थी आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्या प्राध्यापक आणि डॉक्टरांनी दिल्ली, मुंबई, अहमदाबाद इथे रस्त्यावर उतरुन प्रतीकात्मक निदर्शनं केली. 'आरक्षण आल्यास आम्हाला काय कामं करावी लागतील' हे त्यांनी रस्ता झाडून, बूट पॉलिश करुन आणि गाड्या पुसून दाखवलं. ही कसली प्रतीकं आहेत? ठराविक जातींनीच शिक्षण घ्यावं आणि ठराविक जातींनी परंपरेने ठरवून दिलेली कामंच करावी याचीच ही प्रतिकं आहेत. या आंदोलनामुळे काही रुग्णालयांचे बाह्य रुग्ण विभाग बंद ठेवण्यात आले होते. त्यामुळे सामान्य रुग्णांचे हाल झाले. हे डॉक्टरांच्या नीतीमत्तेत बसतं का?

**आरक्षण विरुद्ध गुणवत्ता: सनातनी वाद**

आरक्षण दिले तर गुणवत्ता ढासळेल असा सनातनी बागुलबुवा उभा करण्यात येत आहे. जेव्हा स्त्रियांना आरक्षणाची दारे उघडी झाली तेव्हाही सनातन्यांनी 'स्त्रिया शिकून काय करणार?, त्यांनी चूल व मूल सांभाळावे' असा ओरडा केला होता. आज स्त्रिया गुणवत्तेत पुरुषांपेक्षा काकणभर जास्त अग्रेसर आहेत हे सिद्ध होत आहे. दहावी व बारावीच्या परीक्षेच्या निकालातून हे वेळोवेळी सिद्ध झाले आहे.

'वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आरक्षण ठेवल्यास राखीव जागांमधून येणारे विद्यार्थी उद्या डॉक्टर बनून लोकांच्या जीवाशी खेळतील' अशी राळ उठवली जात आहे. खरं तर गुणवत्ता म्हणजे खरंच काय याचा विचार करणं गरजेचं आहे. केवळ ९५-९६ टक्के म्हणजे गुणवत्ता इतका मर्यादित अर्थ आहे का? आजही आपल्या देशात खेडोपाडी कुठल्याही मोबदल्याशिवाय उपचार करणारे वैदू, हाडवैद्य, प्रशिक्षित डॉक्टरांनाही कधी कधी न उमजलेले आजार ओळखून त्यावर उपचार करणारे, झाड पाल्याची औषधं देणारे अनेक आरोग्यकर्मी, बाळंतपणं सुखरुप पार पाडणाऱ्या दाया आहेत. त्यांच्याकडचं आरोग्याविषयीचं, उपचारांविषयीचं ज्ञान केवळ डॉक्टरकीची पदवी नाही म्हणून नाकारता येणार नाही. या समाजांमधून चांगले डॉक्टर का निर्माण होऊ शकले नाहीत? त्यांच्याकडे गुणवत्ता तर निश्चित आहे पण प्रत्यक्षात पाहता हे सर्व समाज वंचित, शोषित आणि समाजाच्या मते मागास मानल्या जाणाऱ्या जातींमधील आहेत. वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी लागणारं आर्थिक सामाजिक पाठबळ त्यांच्याकडे नाही हेच वास्तव आहे.

'आरक्षण ठेवल्यामुळे आता आम्हाला प्रत्येकाची जात कळेल', 'आतापर्यंत आय आय टी, आय आय एम सारख्या संस्थांमध्ये जातीला थारा नव्हता' असं फार गर्वाने सांगणाऱ्यांनी वर्गातील विद्यार्थ्यांची, त्यांना शिकवणाऱ्या प्रध्यापकांची नावे पाहिली तर त्यांच्या म्हणण्यातील फोलपणा त्यांच्या लक्षात येईल. उच्च जाती वर्गातील मुलंच या संस्थांमध्ये शिक्षण घेऊ शकतात. तेथील प्रवेश परीक्षांच्या स्पर्धेत यशस्वी होण्याकरता शिकवण्या, पुस्तकं, माहितीवर खर्च करावे लागणारे पैसे, लागणारा वेळ आणि या गरजा पुऱ्या करु शकणारी आर्थिक, सामाजिक परिस्थिती आता त्यांच्याकडे आहे हे त्यांनी विसरुन चालणार नाही. ज्याच्याकडे यातील काहीच नाही, त्याची स्पर्धा या खतपाणी मिळालेल्यांशी कशी होऊ शकते. त्यासाठी आरक्षण हे गरजेचंच आहे.

आरक्षणातून जरी प्रवेश मिळाला तरी उच्च शिक्षणाच्या या संस्थांमधील वातावरण आणि संस्कृतीवर अजूनही उच्च वर्गीय आणि उच्च जातीयांचंच वर्चस्व आहे. ती समावेशकही नाही. उलट जातीभेदाचा छुपेपणाने पुरस्कार करणारीच असल्याचं तिथल्याच काही प्राध्यापकांनी नमूद केलं आहे.

अनुसूचित जाती आणि जमातींसाठी असणाऱ्या आरक्षणाचा लाभ मिळवून काही लोक प्रगतीवर असतील परंतु सामाजिक रचनेत अजूनही पडद्याआड त्यांना दुय्यम वागणूक दिली जाते. काही लोकांनी थोडीफार प्रगती केली याचा अर्थ सर्व समाजाची प्रगती झाली असा होत नाही. शिक्षणाचे प्रमाण अजूनही या घटकांमध्ये कमीच असल्याचं आढळून आलं आहे.

मंडल आयोगाने इतर मागासवर्गीय जातींचा अभ्यास करुन त्यांच्यासाठी आरक्षणाची शिफारस केली. आरक्षणामुळे या दुर्बल घटकाची सबलीकरणाची प्रक्रिया सुरु होईल. आरक्षणविरोधकांनी हा सामाजिक न्यायाचा विचार केला पाहिजे.

सामजिक प्रगतीसाठी आरक्षण हे अनेक साधनांपैकी एक साधन आहे. समतोल विकास, सामाजिक व सांस्कृतिक न्याय, अर्थ व राजसत्तेत निर्णायक भागीदारी या गोष्टींचाही विचार करणे आवश्यक आहे.

■■■

अनुभव

# बघ्यांच्या समाजात स्त्रियांची विटंबना

सुनीता धनवडे, अस्तित्व, सांगोला, जि. सोलापूर

८ मार्च हा जागतिक महिला दिन साजरा होत असताना सर्व संघटना, चळवळींना छेद देणाऱ्या काही घटना होऊन गेल्या. सोलापूर, बीड, सांगली या जिल्ह्यातील दलित समाजाच्या ४ महिलांना विवस्त्र करुन गावात त्यांची धिंड काढण्यात आली. बीडमध्ये घडलेल्या घटनेत सदर महिलेला गंभीर मारहाण करण्यात आली, डोळ्यांवर ॲसिड फेकण्यात आलं. संबंधित महिला प्राथमिक आरोग्य केंद्रात पोचली पण तिथे तिला मदत मिळाली नाही. उलट आरोपींनीच तिला घरी पाठवलं. हिंसेच्या संदर्भात आरोग्य यंत्रणांच्या भूमिकेवर इथे प्रश्न उभे राहतात. जत आणि उत्तर सोलापूर या तालुक्यांमध्ये घडलेल्या विदारक घटना लेखात मांडल्या आहेत.

उत्तर सोलापूरमधील तेलगाव हे छोटंसं गाव. गावात सर्व जाती धर्माचे लोक राहतात. त्या गावात मंगलताई (नाव बदलले आहे) नवऱ्याच्या त्रासामुळे गेल्या पाच वर्षापासून माहेरी राहत होत्या. त्यांना सहा वर्षांचा एक मुलगा आहे. मंगलताईंचं शिक्षण सातवी. रोजी करण्याशिवाय पर्याय नाही. नवऱ्याबरोबरील वादामुळे कोर्टात दावा चालू होता. त्यामुळे सोलापूरला नियमित येणे जाणे होते. धाडसाने बोलणाऱ्या, आपलं मत व्यक्त करणाऱ्या मंगलताईंना गावातील प्रस्थापितांनी अवैध धंदे बंद करण्याविषयी तक्रार देण्याच्या संशयावरुन विवस्त्र करुन त्यांची धिंड काढली आणि मारहाण केली. गावाने त्यांच्यावर बहिष्कार टाकला.

सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील मुचंडी हे जतपासून १२ कि. मी. अंतरावरील गाव. सुरेखाताईंनाही (नाव बदलले आहे) मारहाण करण्यात आली. तेलगावमधील घटनेला आठ दिवसांचा कालावधीही उलटला नाही तर फसवून कामाला नेतो म्हणून १७ तारखेस टेकडीवर नेऊन विवस्त्र करुन मारहाण करण्यात आली आणि तिथेच सोडून देण्यात आलं.

दोन्ही घटनांमध्ये गावाची भूमिका बचावाची होती. त्यामध्ये महिलांबद्दल बोललं जात होतं, पण ज्यांनी हा गुन्हा केला त्यांच्याबद्दल मात्र एक शब्दही उच्चारला जात नव्हता. जिच्यावर हिंसा झाली तिच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा 'ती तसलीच आहे' असं म्हणण्यापलिकडे नव्हता. या दोन्ही घटना त्या महिलांच्या लहान मुलांसमोरच घडल्या. त्यांच्यावर झालेले परिणाम दीर्घकाळ न विसरता येण्यासारखे आहेत.

ज्या यंत्रणांनी हिंसाग्रस्त महिलांसोबत असायला हवं होतं त्या यंत्रणाच उदासीन दिसत होत्या. मुचंडी गावातील लोक आपणहून बोलायलाही तयार नव्हते. दोन्ही गावात जणू काही झालेलंच नाही अशी अवस्था होती. दोन्ही घटनांच्या नोंदी त्या घडल्यानंतर तीन दिवसांनंतरच झाल्या आहेत. तोपर्यंत दोघी महिला स्वत:चा जीव वाचवण्याच्या प्रयत्नात होत्या.

प्रत्यक्षात ज्यावेळी महिला आयोगाचे लोक येणार आहेत असं कलेक्टरांकडून पोलिस यंत्रणेस कळालं त्या वेळेस त्यांना सरकारी दवाखान्यात हलवण्यात आलं. जेव्हा माझा ग्रामीण आरोग्य केंद्राशी संपर्क आला त्या वेळेस मागील रेकॉर्ड पाहता दोन दोन दिवसांचा फरक ठेऊन ॲडमिट करण्यात आलं होतं. केस पेपरवरही नॉर्मल असाच शेरा होता. मंगलताईंच्या अंगावर अजूनही सूज, वण तसेच असताना नॉर्मल म्हणूनच औषधोपचार कसा काय होऊ शकतो?

वैद्यकीय तपासणी व औषधोपचार पाहता सुरेखाताईंवरील गुन्ह्याची नोंद १३ दिवसांनी आणि उपचाराला ११ दिवसांनी सुरुवात झाल्याचं दिसतं. मग इतके दिवस सुरेखाताई होत्या तरी कुठं? दरम्यानच्या काळात त्या खाजगी रुग्णालयात भरती होत्या. त्या रुग्णालयाला भेट दिल्यावर त्यांनी आपला या घटनेशी काही संबंध नसल्याचं सांगितलं.

नवऱ्याच्या व्यसनाधीनतेतून होणारी मारहाण नाकारुन निर्भयपणाने स्वतंत्र कुटुंबं उभी करणाऱ्या स्त्रियांवरच्या अत्याचारांना आळा बसण्यासाठी कायदेशीर आणि सामाजिक संरक्षण मिळण्याची गरज आहे. आपल्याला सतत भेडसावणारे प्रश्न असे आहेत,

- भारतात पहिल्यांदा महिला धोरण जाहीर करणाऱ्या महाराष्ट्रात दारु व दारुला संरक्षण देणाऱ्यांचा बंदोबस्त होणार की नाही?
- लोकसंख्येच्या ५०% असणाऱ्या महिलांना मुक्तपणे हिंडण्याचा आणि स्वतंत्र जीवन जगण्याचा अधिकार मिळणार का नाही?
- हिंसाग्रस्त स्त्रियांवर झालेली हिंसा हीदेखील एक प्रकारची हिंसाच आहे हे हा समाज कधी मान्य करणार?
- गरीब गरजू महिलांचे जीवन सुदृढ करण्यात हातभार लावणारे दवाखाने, महिलांना आधार देणारे आहेत का नाहीत?

स्त्रियांचे किंवा स्त्रियांवरील हिंसेचे प्रश्न हे समाजाचे प्रश्न आहेत असं जोपर्यंत हा समाज मानणार नाही तोपर्यंत या देशातील स्त्री सुरक्षित राहणार नाही.

■■■

# न जन्मलेल्या 'नकोश्या'

भूमिका

२००१ च्या जनगणनेने मुलींच्या ढासळत्या संख्येचं भेदक चित्र समोर आणलं आहे. महाराष्ट्रामध्ये ०-६ वयोगटातील मुलींचे दर हजार मुलांशी प्रमाण १९९१ तील ९४६ पासून २००१ मध्ये केवळ ९१३ पर्यंत म्हणजे ३३ अंकांनी घसरलं आहे. गर्भलिंग निवड केल्याने मुलींची संख्या कमी होत आहे. त्यासंबंधी आपण गेल्या अंकात माहिती घेतली. या अंकात महाराष्ट्राच्या आकडेवारीत प्रत्यक्षात कसा बदल होत आहे ते आपण पाहणार आहोत.

**१९९१**

- **राज्याच्या पश्चिमेकडील कोकण किनारपट्टी, नाशिक व नंदुरबार जिल्ह्यात स्त्री पुरुष प्रमाण चांगले.**
- **राज्याच्या पूर्वेकडील जिल्ह्यात स्त्री पुरुष प्रमाण ९५० हून अधिक.**
- **३५३ तालुक्यांपैकी ३५१ तालुक्यांमध्ये हे प्रमाण ९०० हून जास्त.**




**२००१**

- **फक्त पाच जिल्ह्यांमध्ये स्त्री पुरुष प्रमाण ९५० पेक्षा जास्त.**
- **जळगाव ते कोल्हापूरपर्यंत असलेल्या मध्य पट्ट्यातील ९ जिल्ह्यांमध्ये प्रमाण वेगाने कमी. कोल्हापूरमध्ये हे प्रमाण सर्वात कमी.**
- **८५ हून जास्त तालुके ८५१ ते ९०० प्रमाण असलेल्या गटात आले.**

०-६ वयोगटातील मुलींची संख्या किती झपाट्याने कमी होत आहे हे दर्शवणारी ही माहिती प्रसिद्ध झाली आहे राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांनी प्रकाशित केलेल्या **छकुल्या ... मुकलेल्या** या पुस्तिकेत. पुस्तिकेमध्ये राज्याचे तालुकानिहाय लिंग गुणोत्तर देण्यात आले आहे. १९९१ ते २००१ या काळात जनगणनेनुसार ०-६ वयोगटातील मुला-मुलींच्या प्रमाणात कशी तफावत झाली आणि प्रत्येक जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये काय चित्र आहे हे या पुस्तिकेत जिल्ह्याच्या नकाशांमधून स्पष्ट करण्यात आलं आहे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये तालुकानिहाय काय बदल झाले, कोणत्या तालुक्यांमध्ये जास्त घट झाली, कोणत्या तालुक्यांमध्ये प्रमाण स्थिर राहिलं आहे आणि कोणत्या तालुक्यांमध्ये प्रमाणात वाढ झाली आहे याची माहिती जिल्ह्याच्या नकाशासोबत दिली आहे.

ही सर्व माहिती सरकारी कृती कार्यक्रमांसाठी आणि या विषयावर संशोधन करणाऱ्यांसाठी नक्कीच उपयोगी ठरु शकते. आपल्या जिल्ह्यामध्ये किंवा तालुक्यामध्ये बालक-बालिका प्रमाण काय आहे, त्यात घट झाली असल्यास त्यामागची कारणं नक्की काय आहेत याचा शोध घेऊन त्याबाबत काही कृती कार्यक्रम आपल्या भागात घेता येऊ शकतील.

पुस्तिकेमध्ये २००४ साली पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र संस्थेने केलेल्या सोनोग्राफी सेंटर्सच्या अभ्यासातील काही महत्त्वाचे निष्कर्ष माहितीसाठी दिले आहेत. या अभ्यासातील एक महत्त्वाचा निष्कर्ष म्हणजे ज्या भागात सोनोग्राफी सेंटर्स अधिक त्या भागातील बालक-बालिका प्रमाणातील घट जास्त आहे. यावरुन सरळ असं लक्षात येतं की सोनोग्राफी केंद्रांवर नियंत्रण अत्यावश्यक आहे.

**छकुल्या .... मुकलेल्या- महाराष्ट्र राज्यातील तालुकानिहाय स्थित्यंतर**


प्रकाशन: राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे (२००५)

ह
म
स
फ
र

# पुरुषांसाठी प्रशिक्षण मार्गदर्शिका

**पुरुषांसोबत आरोग्य, लिंगभाव, लैंगिकता आणि पुरुषत्व या मुद्द्यांवर काम करण्यासाठी स्वतःच्या वैयक्तिक जडणघडणीबद्दल मोकळेपणाने बोलणाऱ्या, पुरुषत्वाच्या समाजमान्य प्रतिमा नाकारताना कराव्या लागणाऱ्या झगड्यांबद्दल देवाणघेवाण करू शकणाऱ्या संवेदनशील पुरुष संवादकांची फार मोठ्या प्रमाणावर गरज असल्याचे लक्षात येते. त्याचबरोबर पुरुषांना केंद्रस्थानी ठेवून या विषयांबाबतचा आशय मांडू शकतील अशा साधन-साहित्याची उणीवही जाणवते. ही उणीव भरून काढण्यासाठी तथापिच्या पुढाकाराने कृती रिसोर्स सेंटर (कार्यक्षेत्र-उत्तर प्रदेश, उत्तरांचल व बिहार), एकलव्य (मध्य प्रदेश) आणि सहज, बडोदा या संस्थांच्या सहभागाने पुरुषांनी पुरुषांसोबत काम करण्यासाठी प्रशिक्षण मार्गदर्शिका निर्माण झाली. ऑगस्टमध्ये ती प्रकाशित होत आहे.**

समाजविकासाच्या विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या आपल्यापैकी अनेकांना हे नक्कीच जाणवले असेल की कधी-ना-कधी तरी, आरोग्य आणि लैंगिकता या विषयांवर काम करताना, आपल्याला पुरुषांसोबत काम करण्याची फार गरज आहे. युवक आणि पुरुषांबरोबर नागरिकत्व, हक्क, लिंगभाव, आरोग्य, लैंगिकता आणि हिंसाचार या प्रश्नांवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी/गटांसाठी संसाधन साहित्य निर्माण करणे, हा या प्रशिक्षण मार्गदर्शिकेचा प्रमुख हेतू आहे. सामाजिक न्याय हे मार्गदर्शिकेतील आशयामागचे प्रमुख सूत्र असले तरी 'पुरुषांना केंद्रस्थानी' ठेवून लेखन करण्याचा यामध्ये प्रयत्न झाला आहे.




**या मार्गदर्शिके मध्ये काय आहे?**

पुस्तिकेमध्ये सहा स्वंतत्र विभाग आहेत.

◈ न्याय आणि समता
◈ लिंगभाव
◈ लैंगिकता
◈ आरोग्य
◈ हिंसाचार
◈ संवाद/संज्ञापन कौशल्ये

प्रत्येक विभागात अनेक सत्रांचा समावेश असून, त्याचबरोबर हा विभाग शिकण्यामागची उद्दिष्टे, संवादकासाठी काही टिपणे, सत्रात सहभागींना देण्यासाठी काही छापील पत्रके, अधिक अभ्यास आणि वाचनासाठी काही संदर्भ-नोंदी, स्वाध्याय आणि केस स्टडीज देखील यामध्ये दिलेल्या आहेत. या प्रशिक्षणाचा हेतूच मुळात मानसिकता बदलण्याचा आणि प्रचलित विचारांना, चौकटींना आव्हान देण्याचा असल्यामुळे काही 'नेहमी विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची यादी' या मार्गदर्शिकेमध्ये देण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच प्रत्येक सत्राशेवटी संवादक देत असलेल्या प्रतिसादाच्या काही शक्यताही नमूद केल्या आहेत.

**ही मार्गदर्शिका कोणासाठी?**

या मार्गदर्शिकेची पूर्व-चाचणी झालेली आहे. लिंगभाव, लैंगिकता आणि आरोग्य हे विषय घेऊन वेगवेगळ्या गटातील पुरुषांबरोबर काम करणाऱ्या सर्वांना या मार्गदर्शिकेचा वापर करता येईल. यामध्ये पौंगडास्थेतील मुलगे, शेतकरी मंडळे, पंचायतीमधल्या पुरुष सदस्यांबरोबर काम करणारे स्वयंसेवक, प्रजननक्षम वयोगटातील महिलांचे नवरे, एच.आय.व्ही/एड्स रुग्णांचे आरोग्यसेवक, लिंगभावावर आधारित हिंसाचाराच्या प्रश्नांवर पुरुषांसोबत काम करणारे संवादक आदी लोकांचा समावेश होऊ शकतो.

जे प्रशिक्षक अथवा संवादक या मार्गदर्शिकेचा वापर करतील त्यांनी अंशतः तरी अंतर्मुख होऊन स्वतःशी संवाद केलेला असावा. म्हणजेच लिंगभाव, लैंगिकता आणि आरोग्य या संकल्पनांची एक पायाभूत समज त्यांच्यामध्ये असावी. काही प्रमाणात ते संवेदनशील असावेत आणि स्वतःचे अनुभव आणि संघर्षाबद्दल सहभांगीबरोबर बोलण्याची त्यांची तयारी असावी.


मागदर्शिका इंग्रजी (रु. १५०) व हिंदी (रु. १२५) भाषांमध्ये उपलब्ध आहे. प्रतींसाठी तथापिशी संपर्क साधावा. मराठी मार्गदर्शिका ऑगस्टमध्ये प्रकाशित होईल.

■■■

माहितीच्या जगात

# तथापि ची नवीन प्रकाशने

## पाळीचक्रात काय घडत आहे?




मासिक पाळी दरम्यान अंडाशयात आणि गर्भाशयात नक्की काय घडतं हे समजून घेण्यासाठी **मासिक पाळीचं चाक** हे साधन तयार करण्यात आलं आहे. ते लवकरच तयार होत आहे.

या चाकामध्ये मासिक पाळीची प्रक्रिया ८ टप्प्यांमध्ये स्पष्ट करण्यात आली आहे. इस्ट्रोजन (अंडसोबत) आणि प्रोजेस्ट्रॉन (गर्भरक्षक) या दोन संप्रेरकांमुळे होणारे बदल या टप्प्यांमध्ये दाखवले आहेत. पाळीचा रक्तस्राव थांबल्यानंतर निष्क्रीय अंडाशय, अंडोत्सर्जनाआधी अंडं परिपक्व होण्याची प्रक्रिया, अंडोत्सर्जन, पिवळी पेशी तयार होणे आणि परत पाळी सुरु होणे या सर्व प्रक्रिया आणि त्यानुसार अंडाशय व गर्भाशयात होत जाणारे बदल या ८ टप्प्यांमधून स्पष्ट होतात.

पाळी चक्रामध्ये योनिमार्गातून येणारे विविध स्राव, गर्भाशयमुखातून पाझरणारा विशिष्ट प्रकारचा स्राव, म्हणजेच श्लेष्मा व त्यातील बदलही दाखवले आहेत. या बदलांमधून स्राव, श्लेष्मा जननक्षम आहे का नाही, हे समजू शकते. स्राव नोंदवण्याच्या खुणाही इथे दिल्या आहेत.

मासिक पाळीविषयी शास्त्रीय माहिती मिळवण्यासाठी आणि ती इतरांना सोप्या पद्धतीने समजून सांगण्यासाठी या साधनाचा उपयोग होऊ शकेल.

■■■

## संयुक्त राष्ट्रसंघाचा सीडॉ करार, १९७९ - स्त्रियांच्या अधिकारांचा जाहीरनामा (पुस्तिका व पोस्टर संच)




१९७९ साली संयुक्त राष्ट्रसंघाने स्त्रियांवरील सर्व भेदभाव दूर करणारा सीडॉ करार जाहीर केला. १९९३ साली भारताने हा करार पारित केला म्हणजेच भारतात हा करार लागू झाला. भेदभावाचं निर्मूलन, प्रत्यक्ष समानता आणि सरकारचं उत्तरदायित्व ही या कराराची मुख्य तत्त्वं आहेत.

सीडॉ कराराचा दस्तऐवज पुस्तिकेत दिला आहे. करारातील कलमांचा अर्थ व्यक्त करणारी विविध लोकशैलीतील चित्रं, मूर्तींच्या प्रतिमा यांचा वापर पुस्तिकेत करण्यात आला आहे. स्त्रियांच्या अधिकारांबाबत काम करणाऱ्या व्यक्ती, संस्था अथवा संघटनांना या पुस्तिकेचा उपयोग होईल.

परंपरागत रीतीरिवाज आणि त्यातून होणारे भेद दूर करण्याकरिता शासन व आपण एकत्र प्रयत्न करु या असा संदेश देणारा सीडॉ करारासंबंधी ३ पोस्टरचा संच तथापिने तयार केला आहे. पोस्टर इंग्रजी व मराठीत उपलब्ध आहेत.

**निर्मिती: तथापि ट्रस्ट, पुणे (देणगी मूल्य: पुस्तिका - रु. १०/-, पोस्टर - रु. १०/- प्रति पोस्टर)**

■■■



जिव्हाळ्याच्या वाचकांसाठी एक दुःखाची बातमी. अगदी सुरुवातीपासून जिव्हाळ्याच्या अंकाचं वाचन, त्यावर प्रतिक्रिया आणि लेखनातील दुरुस्त्यांसाठी मदत करणारी आपली मैत्रीण रोहिणी लेले हिचं नुकतंच निधन झालं. रोहिणीने अनेक स्वयंसेवी संस्थांसोबत काम केलं. सामाजिक क्षेत्रातील संशोधन आणि खासकरुन गुणात्मक संशोधनामध्ये तिचा खूप अनुभव होता. कॅन्सरसोबत दीर्घ काळ लढा देत अखेर २० मे २००६ रोजी तिचं निधन झालं.

शेवटच्या पानावर साभार: रोहिणी लेले हे वाक्य आता परत लिहिलं जाणार नाही. (तथापि टीम)

स्त्री चळवळ... पान ५ वरुन...

आर्थिक धोरणं आणि त्यांचे स्त्रियांवर होणारे परिणाम हा कामाचा दृष्टीकोन ठेवल्यास विविध जात, धर्मांच्या स्त्रियांचं संघटन होऊ शकतं तसंच वैयक्तिक कायदे आणि त्याचे स्त्रियांवर होणारे परिणाम तपासता येऊ शकतात. व्यापक लढ्यांमध्ये सहभागी झाल्यास, इतर जाती धर्माच्या स्त्रियांसोबत आपण आपले प्रश्न मांडले तर त्यातून सामर्थ्य मिळवता येऊ शकतं असंही मत मांडण्यात आलं. सत्राचं अध्यक्षस्थान नॅन्सी गायकवाड यांनी भूषविलं

या पुढचं सत्र 'जाती व्यवस्था, स्त्री प्रश्न आणि संघर्ष' हे होतं. या सत्रात सुलभा पाटोळे, सुप्रिया गायकवाड आणि निर्मला भाकरे यांनी विचार मांडले. अध्यक्षस्थानी कुमुद पावडे होत्या. स्त्रियांच्या शोषणावरची चर्चा जातीच्या चर्चेशिवाय अपूर्ण आहे, दलित स्त्रियांचं शोषण आणि त्यांची विशिष्ट परिस्थिती लक्षात घेता दलित स्त्रियांची वेगळी संघटना/चळवळ असणं आवश्यक आहे असंही मत मांडण्यात आलं. ब्रिटिश काळातील जात व्यवस्था आणि स्त्रियांच्या शोषणाबाबत फुले आणि आंबेडकरांनी मांडलेले विचार आणि कार्य याची मांडणी झाली. जात अजूनही अस्तित्वात असल्याने ती नाकारता येणार नाही, चळवळ म्हणून जातीच्या प्रश्नावर कसं काम करावं यावर या सत्रात बरीच चर्चा झाली. काही भागांमध्ये दलितांना संस्थांच्या बचत गटासारख्या कार्यक्रमातून वगळण्यात येत आहे याबाबत जोरदार प्रश्न उठवले गेले. दलित नेतृत्व तयार न करता दलितांसोबत काम करण्याबाबतही रोष व्यक्त करण्यात आला.

दुपारच्या 'स्त्री संघटना आणि संघर्षाचे मार्ग' या सत्रात साधना दधिच, किरण मोघे, स्वातीजा मनोरमा यांनी भाग घेतला. सत्राच्या अध्यक्ष वसुधा सरदार होत्या. साम्राज्यवाद, जागतिक धोरणाचे आर्थिक, सामाजिक परिणाम, जात-जमातवाद आणि जातव्यवस्था ही स्त्री संघटनांपुढची प्रमुख आव्हानं असल्याचं मांडलं गेलं. चळवळीचं एनजीओकरण झाल्याने राजकारण हा मुद्दाच नाहीसा झाला हा सर्वात मोठा परिणाम आहे. पुढच्या कामाची पद्धती ही लोकांसोबतच असायला हवी असं मांडण्यात आलं. काही संस्था संघटनांचं काम हे स्थानिक विरोधाच्या, उठावाच्या स्वरुपात पाहिलं गेल्याचं मांडण्यात आलं.

बिगर राजकीय स्वायत्त स्त्री संघटनांची सुरुवात बलात्कार, अत्याचाराचे प्रश्न पक्षीय संघटनांमध्ये पुढ न आल्याने झाली. आर्थिक, जातीशी संबंधित, लैंगिकतेबाबत अशा विविध प्रश्नांमध्ये प्राधान्य ठरवता येणार नाही. त्यांचा एकत्रितरित्याच विचार करावा लागेल हे मांडतानाच मुंबईतील डान्सबार बंदी, त्याच्याशी निगडीत रोजगाराचे मुद्दे आणि लैंगिकतेवरील नियंत्रण याविषयी संघटनांची मतं मांडण्यात आली.

जागतिकीकरणामुळे निर्माण झालेले सर्व प्रश्न सोडवता येणं शक्य नसलं तरी काही प्रमाणात समस्यांचं जाळं कुरतडण्याचं काम काही एन जी ओ थोडी स्वस्थता लाभल्यामुळे करु शकल्या आहेत. त्यात सगळ्यांना यश आलंच आहे असं नाही असंही मांडण्यात आलं.

शेवटच्या सत्रामध्ये वंदना सोनाळकर यांनी दोन दिवसाच्या बैठकीचा आढावा घेतला. यामध्ये स्त्रियांची आजची परिस्थिती, रोजगाराची स्थिती, सुरक्षितता या मुद्द्यांचा समावेश होता. सत्राच्या अध्यक्ष ऊर्मिला पवार यांनी आपलेविचार मांडताना दलित स्त्रियांचे प्रश्न स्त्री चळवळीमध्ये कितपत लक्षात घेतले गेले, या प्रश्नांची उतरंड याबाबत मतं मांडली. तसंच स्त्री चळवळीने प्रबोधनाचं काम थांबवू नये, बुवा बाबांच्या, देवधर्माच्या आणि कर्मकांडाच्या जाळ्यातून स्त्रियांना आपण कसं बाहेर काढणार आहोत असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

या सत्रानंतर बैठकीचा समारोप करण्यात आला.

■■■

**PRINTED MATTER**

**बुक पोस्ट**

प्रति

**परत पाठवायचा पत्ता**

**तथापि ट्रस्ट**
४२५ डी पी - ७७, टिम वि कॉलनी,
मुकुंद नगर, पुणे ४११०३७
दूरध्वनी : ०२० - २४२६०२६४; २४२६७९०८
Email: tathapi@tathapi.org
Website: www.tathapi.org

अंकातील प्रत्येक मताशी तथापि संस्था सहमत असेलच असे नाही. अंकाचा व संस्थेचा उल्लेख करून कोणालाही या अंकातील माहितीचा वापर कर ता येईल.

जिव्हाळा देणगी वर्गणी: वार्षिक - रु. ३५, त्रैवार्षिक - रु. १०० खाजगी वितरणासाठी